ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

# श्रीचक्रधर स्वामींचा विधवा स्त्री विषयक दृष्टीकोण

**प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे**

*सहायक प्राध्यापक, मराठी विभाग*

*श्री कि. न. गोयनका महाविद्यालय , कारंजा (लाड), जि. वाशिम*

*ईमेल आयडी:* drkwaghmare@gmail.com

## प्रस्तावना

मानव हा प्राणी मानला गेला असून त्याचे स्त्री आणि पुरुष असे दोन घटक मानले गेले आहेत. वास्तविक पाहता हे दोन्ही घटक एकच आहेत परंतु येथील पुरुषसत्ताक संस्कृतीने या दोन्ही घटकांचे विभाजन करीत पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ अशी मांडणी केली आहे. परंपरेने सातत्याने स्त्रीला कनिष्ठ ठेवण्याचा प्रयत्न केला. तिला चूल आणि मुल यापुरते मर्यादीत केले. 'न स्त्री स्वातंत्र्य महर्ती' अशी मनुवादी संस्कृती या देशात रुजली. या स्त्रीमध्ये देखील श्रेष्ठ आणि हिन असे दोन गट करण्यात आले. विवाहित स्त्री ही चांगली तर अविवाहित स्त्रीला चवचाल असे येथील पुरुषसत्ताक संस्कृतीने ठरविले. त्यातही विधवा स्त्रीला समाजात कुठलेच स्थान नव्हते. तिच्याकडे अशुभ म्हणून पाहिल्या जात होते. तिचा दर्जा समाजात सर्वात खाली होता. शूद्रापेक्षाही हिन वागणुक विधवा स्त्रीला दिल्या जात होती. अनेक संत महात्म्यांनी व महापुरुषांनी विधवा स्त्रीला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. यात ईश्वरचंद्र विद्यासागर, राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, धोंडो केशव कर्वे अशा अनेक महापुरुषांची नावे आपण घेतो. या महापुरुषांचे कार्य वादातीत आहे. परंतु विधवा स्त्रीला पहिल्यांदा स्वातंत्र्य मिळवून देण्याचा प्रयत्न बाराव्या शतकात सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी महाराष्ट्रात केला. बाराव्या शतकात मनुचा वारसदार असणाऱ्या हेमाद्री पंडिताने स्त्रीला विविध व्रतवैकल्यात गुरफुटून टाकले होते. विधवा स्त्रीचे तोंड पाहू नये अशीच त्याची आज्ञा होती. अशावेळी स्वामींनी विधवा स्त्रीच्या स्वातंत्र्यासाठी रणशिंग फुंकले. सारंग पंडितांच्या माध्यमातून समस्त स्त्री द्वेष्टयांना स्वामींनी 'तुमचा काय जीवु आणि यांच्या काय जिऊल्या' असा जाब विचारत आव्हान दिले. स्वामींना याच्या परिणामांना सामोरे जावे लागले परंतु स्वामींनी त्याची पर्वा केली नाही. त्यांनी विधवा स्त्रियांची बाजू समर्थपणे घेत त्यांना धर्माच्या माध्यमातून पुरुषांच्या समान दर्जा मिळवून दिला. स्वामींचा हा क्रांतीकारक प्रयत्न पुढील विधवा स्त्री उद्धारकांच्यासाठी प्रेरक ठरले. स्वामींचा विधवा स्त्री विषयक दृष्टिकोण लीळाचरित्रातून आपणास उद्धृत होतो.

**महत्त्वाचे शब्द** : विधवा, स्त्री, पुरुषसत्ताक

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

**श्रीचक्रधर स्वामींची स्त्री विषयक भूमिका**

स्वामींचे परिभ्रमण संपूर्ण महाराष्ट्रात झाले. विशेषता ग्रामीण भागात त्यांचा संचार जास्त होता. स्वामींच्या विचारांनी तत्कालीन बहुजन समाज भारावून गेला होता. स्वामींनी कोणाचीही भीड न बाळगता अगदी स्पष्टपणे आपले विचार मांडले. 'हा अवघा जणु थकला ठेला असे गा' अशी जाणीव स्वामींना होती. स्वामींनी तत्कालीन समाजाच्या भाषेत त्यांना खरे ज्ञान समजावून सांगितले. लोकांच्या मनातील भ्रामक कल्पना दूर केल्या. स्त्रियांना व्रतवैकल्यातून बाहेर काढून त्यांना मुक्तीचा खरा मार्ग दाखविला. यामुळे मोठया प्रमाणात स्त्रीया स्वामींकडे वेधल्या गेल्या. नागुबाई उर्फ बाइसा सारख्या कडक आचरण असलेल्या पयोव्रती पंथाच्या आचार्य असलेल्या स्त्रीला स्वामींनी भक्तीचा सोपा मार्ग सांगितला आणि त्या स्वामींच्या शिष्य झाल्या. आयुष्याच्या अंतापर्यंत त्या स्वामींच्या सोबत होत्या. मनोभावे त्या स्वामींच्या सेवा करीत असतं. महादाइसा या देखील स्वामींना अनुसरलेल्या एक विद्वान पण विधवा स्त्री. व्रतवैकल्य करणे, पोथी पुराण ऐकणे,तीर्थयात्रा करणे यालाच महादाइसांनी आपले जीवित कर्तव्य बनविले होते. तत्कालीन विधवा स्त्रीयांची स्थिती महादाइसां सारखीच होती. लहानपणी आलेले वैधव्य त्यामुळे कुठलाही दोष नसतांना आयुष्यभर समाजाचे टोमणे विधवा स्त्रीला सहन करावे लागत असे. रामदेवराव यादवाची राणी कामाइसा हिला अनिच्छेने सती जावे लागले होते. खुद्द राणीचीच ही व्यथा तर सर्वसामान्य स्त्रीचे दुःख कसे असेल याची कल्पना येते. दादोसा सारख्या धर्ममार्तंडांनी महादाइसा सारख्या विधवा स्त्रियांना आपल्या स्वार्थासाठी तीर्थयात्रा, पोथीपुराणात गुंतविले होते. स्वामींनी त्यांना यातून बाहेर काढले. त्यांना खरा देव आणि धर्म समजावून सांगितला. महादाइसा जेव्हा द्वारावतीला जाऊ इच्छितात त्यावेळी स्वामी त्यांना समजावून सांगतात 'द्रव्य देउनि मागौता वज्र राज्यीं बैसवीला : राज्यासि सेस भरिली : मग तेणे आपूलिया परी समूद्राचां कांटी एकि द्वारावती केली : एकि पासाणाची प्रतिमा केली : तीसि लोकू जातु असे : आता तेथ काइ असे? बाइ ते द्वारावती नव्हे : तो श्रीकृष्ण नव्हे : ते वज्राची प्रतिष्ठा :' महादाइसा पुराण ऐकून येत असत आणि स्वामींकडून पुराणातील सत्य–असत्यता पडताळून घेत असतं. महादाइसा सतत काही तरी स्वामींना विचारत असतं. त्यामुळे स्वामी त्यांची प्रशंसा करतांना 'म्हातारी जिज्ञासू, म्हातारी चर्चकु सतत काही तरी पुसतची असे' असे उद्गार काढतात. महादाइसांचे पुर्वाश्रमीचे नाव रुपाइसा होते परंतु त्यांच्या विद्वतेवरुन स्वामींनी त्यांना त्यांच्या पणजीचे नाव महादाइसा दिले. एकवेळ महादाइसा स्वामींना त्यांच्या आजीची महती सांगतात. 'जी जी : वायेनायेकाची आजी : तया नावं महादाइसें : तीयें प्राज्ञें जी : तिहीं वाचिलें होते : आणि तयां म्हाळसी प्रसन्न : तयांसी प्रत्यक्ष बोले : तीयें महादेरायाचीं पुरहिते जी : राजा भलतेंयातें पुसे : तयां भविष्य स्फुरे : एक वेळ तेहीं वीद्वांस खंडिले जी : ऐसीया बाइला प्राज्ञा : आपण काही नेणिजे जी :' यावर स्वामी म्हणतात 'बाइ : महादेरायाचां ठाइं तिये महदाइसें : आणि तुम्ही एथचीं महादाइसें : तिये तयासीं बोलति : तरि तुम्हीं यासी बोलावे :' हीच विधवा महादाइसा पुढे मराठीची आद्य कवयित्री महदंबा झाली. महादाइसांसोबत त्यांची विधवा बहिण उमाइसा आणि विधवा आई आबाइसा यांना देखील स्वामींनी आश्रय दिला.

अशीच आउसा नावाची एक विधवा स्त्री स्वामींच्या सन्निधानामध्ये येते. ही देखील अतिशय धार्मिक असते. पुजापाठ करीत असते. तिच्या सौंदर्याचा व तारुण्याचा कोणीही गैरफायदा घेऊ नये म्हणून ती सतत आपल्या सोबत कुत्रा वागवत असते. अतिशय कमी वयात वैधव्य आल्यानंतर देखील आउसा कोणाचीही भीडभाड न बाळगता आपले जीवन जगतं असते. आउसाला गंगातीराला जा तिथे तुला परीस मिळेल व तुझ्या जीवनाचे सोने होईल असा दृष्टांत होतो.

ISSN–2277- 8721
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

तेव्हा ती शोध घेत गंगातीरावर येथे तेव्हा तिची स्वामींशी भेट होते. स्वामींनी तिच्याकडे असलेली देवपुजा पाण्यात टाकण्यास सांगितली. व तिला भक्तीचा साधा व सरळ मार्ग सांगितला. आउसाला स्वामींनी विधवा असून देखील अतिशय आदराचे स्थान दिले. मार्गाचा व्यापार तिच्या हवाली केला. आउसाच्या मनात खदखद होती की माझ्या वडिलांना मुलगा नव्हता मीच त्यांचा पुत्र म्हणून त्यांचे पिंडदान राहिले आहे. त्यावेळी स्वामींनी आउसाच्या हातुन सर्व विधी करुन पींडप्रदान चरितार्थ केले. मृत्यूनंतरचे सर्व क्रियाकर्म, पिंडप्रदान करणे हा केवळ पुरुषांचा अधिकार. यामध्ये स्त्रीला कुठेही स्थान नव्हते. अशावेळी स्वामींनी स्वतः आउसांच्या माध्यमातून स्त्रीयांना देखील मरणोत्तर क्रिया करण्याचा अधिकार सर्वप्रथम महाराष्ट्रात प्राप्त करुन दिला. आउसा सारख्या अनेक विधवा स्त्रीयांचे श्रीचक्रधर स्वामी हक्काचे माहेर बनले होते.

### दु:खी, कष्टी विधवा स्त्रीयांचा आधार स्वामी

विधवा स्त्रीयांचा स्वामींकडे नेहमीच वावर असे. स्वामींनी देखील कधीच विधवा स्त्रीयांसोबत भेदभाव केला नाही. त्यांना इतर स्त्रीयांच्या बरोबरीने स्वामींनी वागणुक दिली. किंबहुना विधवा स्त्रीयांना स्वामींकडे थोडा जास्तच आदर होता. अशाच वसमतच्या माइबाइं या विधवा बाई आपल्या प्रापंचिक दु:खाने त्रस्त असतात आणि द्वारकेला जाऊन आत्महत्या करण्याचा विचार करतात. त्यावेळी वेरुळला स्वामींशी त्यांची भेट होते आणि स्वामी त्यांचे दु:ख जाणून घेऊन ते दूर करतात. त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करतात. त्यांचे नामकरण शांताबाईसा असे करतात. अशाच एल्हासा नावाच्या विदर्भातील एक स्त्री स्वामींच्या सन्निधानात येतात. त्यांचा साधाभोळा स्वभाव पाहून स्वामी त्यांचे 'साधा' असे नामकरण करतात. स्वामी त्यांना अभयदान देतात. या साधा ज्यावेळी रानातील फुले आणून स्वामींना वाहतात त्यावेळी बाइसा रागवतात परंतु स्वामी 'एथ सुवर्णपुष्प वाहिजे' असे म्हणून प्रशंसा करतात. साधांना स्वामी काही मागा असे म्हणतात त्यावेळी साधा मला मागणे येत नाही असे सांगतात. त्यावेळी स्वामी साधांना पुन्हा काही तरी मागा असे म्हणतात तेव्हा साधा तुमचे सन्निधान सतत मिळो अशी मागणी करतात त्यावेळी स्वामी त्यांच्यावर प्रसन्न होतात आणि म्हणतात 'साधे हो : नेणोनी जरि ऐसे मागितले : तरि जाणतीति तरि काइ मागिजता :' असे गौरवोद्गार त्यांच्या बद्दल काढतात.

लळिताइसा नामक गुरव स्त्रीचा काळस्फोट नामक आजार स्वामी बसवतात. देमती, लखुबाइसा, जोमाइसा, एल्हाइसा, राणाइसा, लाखाइसा, सामकोसा, उमाइसा अशा जवळपास 44 स्त्रियां स्वामींच्या सन्निधानात होत्या. यातील बहुतेक स्त्रिया या विधवाच होत्या. त्यांना खरा धर्म, खरा देव स्वामींनी समजावून सांगितला. तसेच मानवता, गृहव्यवस्था, रोगराई या अनुषंगाने मार्गदर्शन केले. दु:खी, कष्टी स्त्रियांचे स्वामी माउली बनले होते. यासंदर्भातील लीळाचरित्रातील पुढील लीळा पाहिल्यावर स्वामींच्या माऊलीपणाची कल्पना येते.

'एकी बाइल ते गर्व्हार : ते मढासि आली : गोसावियासी विनविले : सर्वज्ञे म्हणीतले : बाइ हे असो देया : मग ते मढु झाडी : तीएसि बाइसे जेऊ घालीति : मग तीए नववा मासु रीगला : मग सर्वज्ञे म्हणीतले : बाइ यासि आता नको झाडु देवो : मग बाइसे तेया झाडु नेदीति : एकु दी गोसावियासि पूजावस्वर जालेयानंतरे वीहरणा बीजे केले : मग मागुते मढाते बीजे केले तव तयासि दारंठाचेया पटिसाळेवरी प्रसुती जाली असे : पूढा लेकरु : गोसाविया देखिले आणि दु:ख करु लागली : जी जी माए नाही : ना बहीण नाही : कोण्ही नाही जी : सर्वज्ञे म्हणीतले बाई दुख न करा : हे असे नव्हे : मग सर्वज्ञे म्हणीतले मंडळिका तुम्ही याचे सुइर करा गा : होकां जी : लागैल ते बाइसापासि मागावे : मग नाथोबाये बाज घातलि : तेयाते धुतले : लेंकरुवाचे नाळ खांडिले : सगडिया घातलिया : बाइसें पथ्य करीति : नाथोबा

ISSN–2277- 8721
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

सूति : मग तया पडदणी देती : चीकसा कालउनि देति : मग तीये आपुले आंग माखिती : नाथोबा डोइए तेल घालितिः पाणी ठेविति : तीये पाणियाचा सेकु घेति : लेकरु न्हाणिति : सगडीचि घालिति : पथ्य बाइसेचि करिति : गोसावियासि पूजावस्वर जालेयानंतरे तेथ पडिताळोवया बीजे करिती : मग म्हणती बाळांतीणी बाइसे काइ करताए : जी : जी : गोसावियांचेनि प्रसादे सूखी असे : मग ते बाजलेयाचि वरुनी हात जोडी : मग गोसावी वीहरणा बीजे करीती : वीहरणाहुनिएता पडिताळिती : ऐसी नाथोबाये तयाची बारा दीस सुश्रुषा केली :' या लीळेतून स्वामींचे समाजाकडे ममतेने पाहणारे व स्त्रीच्या दु:खद प्रसंगात धावून जाणारे मन दिसून येते.

**विधवा स्त्रीयांचा स्वामींकडे आदर**

विधवा स्त्रीयांविषयी स्वामी नेहमीच आदर व्यक्त करीत असतं. स्वामींनी कधीही विधवा स्त्रीला हिनविले असे लीळाचरित्रात आपल्याला दिसून येत नाही. या संदर्भात एक सुंदर लीळा आपणास लीळाचरित्रात वाचावयास मिळते. स्वामी डोमेग्रामला असताना तिथे देगावचा एक दु:खी ब्राह्मण स्वामींच्या दर्शनाला येतो. स्वामी त्यांच्या विधवा कन्यांची ख्याली खुशाली विचारुन प्रशंसा करतात तेव्हा तो ब्राह्मण सुखी होतो. ती लीळा मुळातुन वाचण्यासारखी आहे. 'देइगावींचा एकु ब्राह्मणु : तयों पांच कन्या : तीया पांचै वीधवा : म्हणौनि तेयांते पांचरांडा आला : पांचरांडा गेला : ऐसे म्हणति : तेणें तो ब्राह्मणु जळे : मग तो एकु दीं गोसावीयांचेया दरीसनां आला : आणि सर्वज्ञें म्हणीतलें : भटो तुमचिया पंचगंगा निकेनि असति? जी जी : निवालां जी : ऐसें मातें कव्हणी न म्हणे जी : मातें पांचरांडा वांचौनि आळवीति ना जी :' ही लीळा स्वामींचा विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोण किती आदराचा होता याची प्रचिती आणल्याशिवाय राहत नाही.

स्वामी जेव्हा विदर्भात रामटेकला जातात तेव्हा त्यांना बोनेबाया भेटतात. या विधवाच असतात. स्वामींना त्या आपल्या पुत्रासमान मानतात. सेंदुरजनला मासउपवासिनी हा धर्म सांभाळणाऱ्या अनेक विधवा स्त्रियांशी स्वामींची भेट होते. स्वामी या सर्वांचे दु:ख दुर करतात. अचलपूरला रामदरणा या मांडलिक राजाची विधवा आई ही स्वामींची निस्सिम भक्त बनते. स्वामी तिच्या व्रतवैक्यांची पुर्तता स्वत:च करतात. मेहकरला दोन विधवा स्त्रिया स्वामींना भेटतात. स्वामी त्यांच्या मनातील अंधश्रद्धा दूर करतात. गोकुळअष्टमीचे व्रत तोडायला लावतात आणि खरा श्रीकृष्ण आणि त्याची खरी भक्ती कशी करायची हे सोदाहरण पटवून देतात.

**समारोप**

स्त्रियांच्या संदर्भात स्वामींनी विरहिणीचे, मातेचे, सामान्य स्त्रीचे, दासीचे आणि पतिव्रतेचे दृष्टांत सांगितले आहेत. यातून स्वामींचा स्त्रीविषयक असलेला आदराचा आणि समानतेचा दृष्टिकोण दिसून येतो. स्त्री ही पुरुषा प्रमाणेच एक जीव आहे आणि तिला देखील समान अधिकार आहे हे स्वामींनी ठासून सांगितले. एकदा सारंगपंडित स्वामींकडे आले, तेव्हा त्यांच्या भोवती बाया बसल्या होत्या. स्वामी निरुपण करीत होते. ते पाहून सारंगपंडितांचा पुरुषी अहंकार जागृत झाला आणि ते म्हणू लागले 'कैसीया गुलगुलीया सातसे परवडी वेटाळूनि बैसलिया असत : आवघिया नेऊनि घालिजती तेलंगदेशी : कांडविजती कोदे : मग आपण असिजे गोसावियांच्या सन्निधानी'. सारंगपंडितांचा हा स्त्री विषयीचा अनुदार दृष्टिकोन स्वामींना मुळीच आवडला नाही. यावर स्वामींनी 'हां गा : तुमचा काइ जीऊ : यांचीया काइ जीऊलिया :' असे ठणकाऊन बजावले. यावरुन स्वामींचा स्त्री विषयक समानतेचा दृष्टिकोन दिसून येतो. स्वामींच्या स्त्री विषयक

विचारांची पायाभरणी पुढे स्त्री समानतेसाठी लढणाऱ्यांसाठी प्रेरक ठरली. याच विचारांचा धागा पकडून पुढे विधवा स्त्रीवादी चळवळींनी जोर धरला आणि विधवा स्त्रीला देखील इतर स्त्रियांप्रमाणे समाजात समानतेचे स्थान मिळाले.

**निष्कर्ष**

1) बाराव्या शतकात विधवा स्त्रियांचे जीवन अतिशय दुःखी आणि कष्टी होते.
2) विधवा स्त्रियांच्या दुःखावर श्रीचक्रधर स्वामींनी मायेची फुंकर घातली.
3) विधवा स्त्रियांना समाजात बरोबरीचे स्थान आहे हे स्वामींनी ठणकाऊन सांगितले.
4) विधवा स्त्रियांमधील गुण हेरुन त्यांना स्वामींनी प्रोत्साहन दिले व त्यांना विकसीत होण्याची संधी दिली.
5) स्वामींचे विधवा स्त्री विषयीचे विचार पुढील विधवा स्त्रीयांच्या हक्काच्या चळवळीस प्रेरक ठरले.

**संदर्भ ग्रंथ**

1) अंकुळनेरकर नरेंद्र – लीळाचरित्र, नागपूर महानुभाव मंडळ – 1993, प्रथमावृत्ती
2) इंगोले प्रदीप – चक्रधरांचा परधर्म : वैदिक धर्माशी फारकत, पंचफुला प्रकाशन, औरंगाबाद – 2008, द्वितीयावृत्ती
3) कोलते वि. भि. – लीळाचरित्र, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई – 1978, प्रथमावृत्ती
4) कोळपकर मुरलीधर – महानुभावांचा इतिहास, कोळपकर प्रकाशन, लातूर – 1279, प्रथमावृत्ती
5) तुळपुळे शं. गो. – महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय, व्हीनस प्रकाशन, पुणे – 1976, प्रथमावृत्ती
6) देशपांडे अ. ना. – महानुभाव संतांची सामाजिक आणि वाङ्मयीन कामगिरी, हिंद मुद्रण, नागपूर – 2013, तृतीयावृत्ती
7) नागपुरे पु. चं. – लीळाचरित्र, ओंकार प्रकाशन, अमरावती – 2004, द्वितीयावृत्ती

*Cite This Article:*

***प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे, (2022).*** श्रीचक्रधर स्वामींचा विधवा स्त्री विषयक दृष्टीकोण , ***Electronic International Interdisciplinary Research Journal****, XI (III) May-June, 265-269.*